# भारतातील ग्रीन बँकिंग
# (Green Banking in India)

**प्रा. डॉ. सुरेश चंद्रकांत मेहेत्रे***
*सहयोगी अधिव्याख्याता*
*अर्थशास्त्र विभागप्रमुख*
*बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी*

**प्रा. डॉ. श्रद्धानंद बाबासाहेब माने****
*सहाय्यक अधिव्याख्याता*
*अर्थशास्त्र विभागप्रमुख*
*माधवराव पाटील महाविद्यालय, पालम*

***गोषवारा : (Abstract)***

*एकविसाव्या शतकात आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये संपूर्ण जग प्रकर्षाने पृथ्वीवरील हिरवळीचा ऱ्हास होताना पाहत आहे. जागतिक तापमानवाढीमुळे वातावरणात खूप मोठे बदल संपूर्ण जगात होताना दिसून येत आहेत. जागतिक तापमानवाढीच्या परिणामाविरुध्द लढण्यासाठी सर्वांना एकत्रित येऊन काम करण्याची आवश्यकता दिसून येत आहे. कारण प्रत्येकाने पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी मदत करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने केलेल्या छोट्या छोट्या प्रयत्नांमुळेच जागतिक पर्यावरणाचा ऱ्हास थांबवणे शक्य होणार आहे. बँकादेखील त्यांचा छोटासा प्रयत्न ग्रीन बँकिंग पद्धतीचा अवलंब करून पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी प्रयत्न करत असताना दिसून येत आहेत. कारण ग्रीन बँकिंग ही आर्थिक जगतात पूर्वी कधीही न घडून आलेली घटना आहे. यावरून असे लक्षात येते की ग्रीन बँकिंगच्या माध्यमातून बँका पर्यावरणाचा ऱ्हास थांबवण्यासाठी आणि त्याचे सामाजिक काय परिणाम होतात ते थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. पर्यावरणपूरक बँक म्हणून या ग्रीन बँकेला ओळखले जाऊ लागले. तसेच ग्रेण बँकिंगलाच नैतिक बँक म्हणूनदेखील ओळखले जात आहे. भारतातील बँकांनी ग्रीन बँकेच्या संकल्पना कशा राबवल्या, ग्रीन बनिंग पद्धती अवलंबिताना भारतीय बँकिंग क्षेत्राला कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, यासोबतच या ग्रीन बँकिंगची संकल्पना उत्तमरित्या कशी राबता येईल आणि त्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करावा लागेल याचा अभ्यास या प्रस्तूत शोध निबंधात करण्याचा प्रयत्न केला आहे. हा संपूर्ण शोध निबंध द्वितीयक सामग्रीच्या आधारावर लिहिलेला आहे.*

***सूचनक शब्दः (Keywords)***

*ग्रीन बँकिंग (Green Banking) , शाश्वत विकास (Sustainable Development) , पर्यावरणपूरक बँक (Environment Friendly Bank) , ग्रीन मॉर्टगेज (Green Mortgage)*

**प्रास्ताविक : (Introduction)**

आज आपण पृथ्वीवरील नैसर्गिक संसाधनांचा अविवेकी पद्धतीने वापर करत आहोत. आपल्या भविष्यातील पिढीसाठी कांही शिल्लक ठेवणार की नाही ? असा प्रश्न निर्माण होऊ लागला आहे. महात्मा गांधी म्हणाले होते, “पृथ्वीने प्रत्येक माणसाच्या गरजा पूर्ण होतील एवढ पुरवल आहे, परंतु प्रत्येकाच्या लालसा पूर्ण करण्यासाठी नाही.” देशातील बँकिंग क्षेत्रावर आर्थिक वृद्धी आणि विकासाचा प्रभाव असल्याचे दिसून येते. म्हणून बँकिंग क्षेत्राची पर्यावरणपूरक शाश्वत विकास करण्यासाठी समाजाप्रती प्रतिबद्धता आहे. बँका जरी प्रदूषण करणाऱ्या नसल्या तरी त्यांचा प्रत्यक्ष संबंध विविध कंपन्या, गुंतवणूक प्रकल्प, जे की प्रदूषण करू शकतात त्यांच्याशी येत असतो. ग्रीन बँकिंग ही संकल्पना पारंपारिक बनिन्ग्पेक्षा वेगळी आहे. सुरक्षितता, नफा, नैतिकता, यामध्ये पारंपारिक बँकांचा मोठा वाटा आहे. परंतु ग्रीन बँकिंग ही जी नवीन संकल्पना आहे ती पर्यावरणपूरक सेवा देणे आणि कार्बनडायऑक्साईडचे वातावरणातील प्रमाण बँकिंगच्या माध्यमातून कमी करणे हे उद्दिष्ट ठेवून काम करणारी संस्था आहे. याचाच अर्थ असा की ग्रीन बँकिंग ही पर्यावरणाला फायदा करणारी संस्था आहे. यामध्ये कमीत कमी कागदाचा वापर करणे, पेपर विरहीत ऑनलाईन पद्धतीने व्यवहार करणे आणि शाश्वत विकासाला प्रेरणा देणे हा उद्देश होय. म्हणून आपण सर्वांनी ग्रीन बँकिंगचा वापर वाढवायला हवा जेणेकरून जागतिक तापमानवाढ, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित संकटे यापासून संपूर्ण जगत वाचेल.

**उद्दिष्ट्ये : (Objectives)**

1. ग्रीन बँक संकल्पना समजून घेणे.
2. भारतीय बँकांनी ग्रीन बँकेच्या संदर्भातील धोरणांची अंमलबजावणी कशी केली ते पाहणे.
3. भारतात ग्रीन बँकेची धोरणे राबवताना कोणत्या अडचणी येतात ते पाहणे.
4. भारतात मोठ्या प्रमाणात ग्रीन बंकिंगला प्रोत्साहन देण्यासाठी मार्ग सुचवणे.

**संशोधन पद्धती : (Research Methodology)**

संशोधनासाठी वापरण्यात आलेली माहिती ही विविध अशा द्वितीयक सामग्रीतून घेतलेली आहे. उद्दिष्ट्याना अनुसरून गुणात्मक आणि विश्लेषणात्मक माहिती असणे आवश्यक आहे. म्हणून द्वितीयक सामग्रीचा जसे मासिके, साप्ताहिके,

संशोधनपर लेख, पुस्तके इ चा वापर केला आहे. अधिक तंतोतंत आणि अगदी अलीकडील काळातील माहिती मिळविण्यासाठी इंटरनेटवरून वेबसाईटचा वापर करण्यात आला आहे.

**ग्रीन बँकिंग उत्पादके किंवा सेवा : (Green Banking Products or Services)**

आपल्या ग्राहकांना बाजाराधिष्टीत सेवा देवून त्यांना प्रभावित करण्यासाठी ग्रीन बँका नेहमीच प्रयत्नशील असतात. ग्रीन बँका वेगवेगळ्या संदर्भात पर्याय देण्यासाठी नवीन सेवांची निर्मिती आपल्या ग्राहकांसाठी करत असतात. साधारणपणे खालील बाबींचा समावेश ग्रीन बँकिंग उत्पादनांमध्ये किंवा सेवांमध्ये होतो.

**१. ग्रीन कर्जे :**

पर्यावरणीयदृष्ट्या टिकाऊ मानल्या जाणाऱ्या अशाच उद्योग आणि प्रकल्पांना कर्जे दिली जातात त्यालाच ग्रीन कर्जे म्हणतात.

**२. ग्रीन क्रेडीट कार्ड्स :**

अशी कार्ड जी पर्यावरणपूरक आहेत आणि त्यांच्या वापरानंतर सूक्ष्मजीव क्रिया करून ती नष्ट करता येतील, तसेच या कार्डचा वापर पेपरविरहीत व्यवहार करण्यासाठी होईल.

**३. ग्रीन मॉर्टगेजेस :**

ग्रीन मॉर्टगेजेसमुळे ग्राहकांना पैशाच्या स्वरुपात सूट दिली जाते तसेच गृह कर्जे घेताना अधिकचे गृह कर्जे मंजूर केली जातात. तर ग्राहकांनी उर्जाकार्यक्षमता मानकांचा वापर करून पर्यावरणपुरकतेला मान्यता दिली जावी.

**४. ग्रीन बचत खाते:**

ग्रीन बचत खात्यांच्या बाबतीत ग्राहकांकडून केल्या जाणाऱ्या बचतीमधून अधिकाधिक देणगी देण्याच्या प्रयत्न केला जातो. जेवढी जास्त बचत तेवढी जास्त देणगी पर्यावरणपूरक क्षेत्रांना दिली जातात.

**५. ऑनलाईन बँकिंग आणि मोबाईल बँकिंग :**

अलीकडील काळात बँकांमध्ये कमीत कमी कागदोपत्री व्यवहार केले जात आहेत. ग्राहकांना बँकांपर्यंत कमीत कमी वेळा येण्यासाठी मोबाईल आणि ऑनलाईन बँकिंगचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. ज्याचा पर्यावरणावर चांगला परिणाम होत आहे.

**भारतातील ग्रीन बँकिंगचे उपक्रम:**

भारत सरकार आणि भारतीय रिजर्व्ह बँकेने भारतातील बँकांना ग्रीन बँकेचा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यासाठी 08 नोव्हेंबर 2010 रोजी प्रसिध्द केलेल्या पत्रकात कांही सूचना केलेल्या आहेत. इतर जागतिक संस्थांप्रमाणेच भारतातील बँकांनीदेखील इतर कार्पोरेटप्रमाणे जबाबदारी घ्यावी आणि पर्यावरण पूरक उपक्रम राबवावेत, इलेक्ट्रोनिक पेमेंटचा वापर वाढवावा, पेपरलेस व्यवहारांचा वापर वाढवावा , कोअर बँकिंग उपक्रम राबवावा, सोलार आधारित एटीमचा वापर वाढवावा असे विविध उपक्रम राबवण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. जेणेकरून ग्रीन बँकिंगची संकल्पना अधिकाधिक उपयुक्त ठरेल. सोलार एटीमच्या वापराने 1980 किलोवॅट उर्जा आणि 1942 किलोग्रॅम कार्बन उत्सर्जन प्रतिवर्षी कमी होईल ज्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास थांबेल.

**भारतातील ग्रीन बँकिंगचे फायदे किंवा गुण :**

भारतात ज्यावेळेस पासून ग्रीन बँकिंगची सुरुवात झाली आणि त्याच्या अंमलबजावणीनंतर त्याचे फायदे दिसून येऊ लागले किंवा ग्रीन बँकिंगचे गुण पुढीलप्रमाणे आहेत. ऑनलाईन बँकिंग व्यवहारांमुळे कागदांचा वापर मोठ्या प्रमाणात कमी झाला. व्यावसायीकांमध्ये जागृती निर्माण झाली. पर्यावरणपूरक वाहने, ग्रीन बिल्डींग प्रोजेक्टस, गृहनिर्माण कर्जे, सोलार सिस्टीम इ. करिता कमी दरात कर्जे मिळू लागली. पर्यावरण तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था यांनी विविध उपक्रमांचे आयोजन करून , सेमिनारचे आयोजन करून, ग्रीन बँकिंगची संकल्पना मोठ्या प्रमाणात विकसित करण्याचा प्रयत्त्न केला. याबरोबरच ग्रीन बँकिंगमुळेच बँकांच्या सुविधा वाढल्या, बरीच कामे परस्पर होवू लागली. त्यांचा नफा वाढला, कर्मचार्यांना त्रास कमी होऊ लागला आणि त्यांचा मानसिक तणाव कमी झाला. भारतात प्रामुख्याने खालील वर्षामध्ये बँकांनी ग्रीन बँकिंग सेवांचा अवलंब केला आहे. 1996 मध्ये युनियन बँक ऑफ इंडिया, 2003 मध्ये सिंडीकेट बँक आणि रॉयल बँक केनडा, 2005 मध्ये कॉर्पोरेशन बँक, 2007 मध्ये आय. सी. आय. सी. आय., 2011 मध्ये कॅनरा बँक व आय. डी. बी. आय. आणि एक्झिम बँक इ. बँकांनी ग्रीन बँकिंग संकल्पना राबवण्यास सुरुवात केली.

**ग्रीन बँकिंग समोरील आव्हाने :**

ग्रीन बँकिंग संदर्भातील वरील सर्व अभ्यासानंतर असे लक्षात येते की, या ग्रीन बंकिंगसमोर अनेक आव्हाने सुद्धा आहेत. ज्या सुविधांचा वापर ग्रीन बँकिंगसाठी ग्राहकांना द्यावयाचा आहे त्याच्या प्रत्यक्ष वापराचा खर्च अधिक आहे. या बँकांना त्यांचा अधिकारी वर्ग हा कौशल्यवान हवा असतो. त्यांचा वेतनावरचा खर्च हा अधिक असतो. जर बँकांनी मोठ्या पर्यावरणपूरक उद्योगाला कर्ज पुरवठा केला आणि तो उद्योग जर कांही कारणास्तव बंद पडला तर बँकेची प्रतिष्ठा कमी होते. ब-याच ग्रीन बँका नवीन असल्याने जर मंदीचा काळ अर्थव्यवस्थेत आला तर त्यांना मोठ्यासंकटाना सामोरे जावे लागते. सरकारकडून पर्यावरणपूरक ग्रीन बँकिंगसाठी आजही परिपूर्ण असे कायदे केले गेले नाहीत. चालू व्यवस्थापन पद्धतीमध्ये सुधारणा घडून आणण्यासाठी अधिक स्पष्ट धोरणांची आवश्यकता असते परंतु ग्रीन बँकिंग पद्धतीमध्ये

असे दिसून येत नाही. अश विविध आव्हानांना सामोरे या ग्रीन बँकांना जावे लागते.

**सारांश आणि सूचना :**

जागतिक तापमानवाढ आणि पर्यावरण संरक्षण याविषयी आपल्या ग्राहकांना जागृत करण्यासाठी भारतातातील ग्रामीण बँका चालना देत आहेत आणि देशाचा आर्थिक विकास कसा वेगाने वाढेल यासाठी प्रयत्नशील आहेत. कांही वर्षापूर्वी पर्यंत पारंपारिक बँका ग्रीन बँकिंग पद्धतीचा वापर करत नव्हत्या, पर्यावरणपूरक उद्योगांमध्ये त्यांनी कर्जपुरवठा कमीच केलेला होता. भारतीय बँकांना जागतिक बंकांसारखे पर्यावरणवादी आणि सामाजिक बांधिलकी स्वीकारण्यासाठी त्यांना जागतिक बँकिंगप्रमाणे आपल्याला बदलावे लागेल. जे उद्योगधंदे पर्यावरणपूरक झालेले आहेत आणि जे प्रामाणिक प्रयत्न करत आहेत अशा उद्योगांना बँकांनी अधिकाधिक कर्जे द्यावीत. म्हणून ग्रीन बँकिंग ही संकल्पना बँकांना, उद्योगांना तसेच अर्थव्यवस्थेला देखील फायदेशीर आहे. भारतातील बँकिंग क्षेत्रासमोर ग्रीन बँकिंगचा स्वीकार करण्यासाठी संधी आणि आव्हाने जरी असली तरी ग्रीन बँकिंग व्यवसाय फायदेशीरच ठरेल. म्हणून भारतातील सर्वच बँकांनी शाश्वत बंकिंग्साठी ग्रीन बँकिंग एक व्यवसाय प्रारूप म्हणून विनाविलंब त्याचा स्वीकार करणे फायदेशीर ठरेल. भारतातील बँकिंग क्षेत्राने ग्रीन बँकिंगचा स्वीकार आणि त्याची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी कांही उपाय सुचवले आहेत त्याचा त्यांनी स्वीकार करावा असे वाटते. इलेक्ट्रिक बँकिंगचे विविध प्रकार पुरस्कृत करून राबवावेत, ग्राहकांमध्ये ग्रीन बँकिंगविषयी अधिकाधिक जागरूकता निर्माण व्हावी यासाठी आपल्या वेबसाईटचा अधिकाधिक वापर ग्राहकांनी करावा यासाठी प्रयत्न करावेत. विविध प्रसारमाध्यमांचा वापर करून आपल्या ग्राहकांमध्ये जागरूकता निर्माण करावी, आपल्या विविध ग्राहकाना पर्यावरणपूरक पुरस्कार द्यावेत. पर्यावरणपूरक उद्योगांना जास्तीत जास्त कर्जपुरवठा करावा. माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रावर अधिकाधिक प्रकाश टाकावा. बँकांनी आपल्या कर्मचारी वर्गाला कार्बन उत्सर्जन विरहित सेवांचा वापर करण्यास उद्युक्त करावे. अधिकाधिक स्पष्ट अशा धोरणांचा वापर शाश्वत विकासासाठी करावा.

**संदर्भ: (References)**


१. *Alice Mani: Green Banking through green.*
२. *Alpesh Shah: Indian Banking 2020. Making Decades promise come true, Report BCG*
३. *Bihari S.C.: Green Banking towards socially responsible come true in India.*
४. *Caruntu G.A.: (2008) Methodology to determine the enterprises.*
५. *Dharwal M. & Agrawal A. (2013) Green Banking: An innovative initiative for sustainable development*
६. *Goyal K.A. and Joshi V. (2011) "A Study of Social and Ethical issues in Banking Industry"*
७. *Jha N. & Bhome S. (2014) A study of green banking trends in India*
८. *Meena R. (2014) Green Banking: Innovative for Sustainable Development*
९. *Singh K. (2011), Innovated Technology in Banking Services, Journal pf Internal Banking commerce*
१०. *www.greenbanking.in*